SHIV VANI

# शिव वाणी

सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी

beedshivvani@gmail.com
Mo.9422748792/ 9822628521
L/130/RNP/Renewal/2025-2026

का.संपादक : वेदांत वैभव स्वामी    संपादक : वैभव विवेक स्वामी

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड | साप्ताहिक | मराठी | वर्ष २४ वे | अंक-२४ | सोमवार, दि.१५ जून २०२६ | RNI-MAHMAR2003/14666 | किंमत: ३ रू. | पाने : ४


Beed (Maharashtra) | Weekly | MARATHI | Year-24 | Issue -24 | Monday, Dt.15 June 2026 | RNI-MAHMAR2003/14666 | Rupees - 3 Rs | PAGES - 4

## केंद्र सरकारचे मोठे निर्णय....

### मोदी सरकारचे विकासपर्व वेगात..


नवी दिल्ली । विशेष प्रतिनिधी

केंद्र सरकारने या आठवड्यात पायाभूत सुविधा, विमान वाहतूक, संरक्षण, शिक्षण आणि अर्थव्यवस्था या क्षेत्रांमध्ये अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. आगामी काळात या निर्णयांचा देशाच्या विकासावर मोठा परिणाम होणार असल्याचे मानले जात आहे.



### दिल्ली-एनसीआरमधील जुन्या वाहनांच्या बदलासाठी विशेष योजना मंजूर

नवी दिल्ली - केंद्रीय मंत्रिमंडळाने दिल्ली-एनसीआर परिसरातील जुने ट्रक आणि बस बदलण्यासाठी विशेष योजना मंजूर केली आहे. या योजनेमुळे प्रदूषण कमी करण्यास मदत होणार असून स्वच्छ आणि पर्यावरणपूरक वाहतुकीला चालना मिळणार आहे.




### विमान इंधन दर स्थिर ठेवण्यासाठी 'प्राईस स्टॅबिलायझेशन फंड'

नवी दिल्ली - विमान कंपन्यांना मोठा दिलासा देत केंद्रीय मंत्रिमंडळाने एव्हिएशन टर्बाईन फ्युएल साठी किंमत स्थिरीकरण निधी मंजूर केला आहे. इंधन दरातील चढ-उतारांचा परिणाम कमी करून हवाई वाहतूक क्षेत्राला बळकटी देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.



### अहमदाबाद मेट्रो फेज-२ ए ला हिरवा कंदील

नवी दिल्ली - केंद्रीय मंत्रिमंडळाने अहमदाबाद मेट्रो रेल्वेच्या फेज-२ए प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. कोटेश्वर रोड ते विमानतळ या मार्गामुळे शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होणार आहे.



### आरबीआयकडून परकीय गुंतवणूक वाढविण्यासाठी ६ मोठे निर्णय

नवी दिल्ली - भारतीय रिझर्व्ह बँकेने रेपो दर ५.२५ टक्के कायम ठेवत परकीय गुंतवणूक वाढवण्यासाठी सहा महत्त्वपूर्ण उपाय जाहीर केले आहेत. यामुळे भारतीय रोखे बाजार, बँकिंग आणि अर्थव्यवस्थेत अधिक विदेशी भांडवल येण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



### संरक्षण क्षेत्रात डीआरडीओ ची मोठी कामगिरी

नवी दिल्ली - भारताच्या स्वदेशी क्षेपणास्त्र संरक्षण प्रणालीच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकत डीआरडीओ ने तीन यशस्वी क्षेपणास्त्र चाचण्या पूर्ण केल्या. यामुळे देशाच्या संरक्षण क्षमतेत मोठी भर पडणार असून 'आत्मनिर्भर भारत' संकल्पनेला बळ मिळणार आहे.

## संभाजीनगर-जालना हादरले; बीडसह इतर जिल्हेही तपासाच्या रडारवर?

# मराठवाड्यात बनावट दस्त नोंदणी रॅकेटचा स्फोट!

**● बनावट कागदपत्रांच्या आधारे जमीन व्यवहार; मंगळवारपर्यंत अहवाल सादर करण्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आदेश**



मुंबई । प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर, जालना आणि मालेगाव येथे बनावट शासकीय कागदपत्रे तयार करून दस्त नोंदणी करणे, खोटी खरेदीखते तयार करणे आणि नागरिकांच्या मालमत्ता परस्पर विकण्याचे धक्कादायक प्रकार उघडकीस आल्यानंतर राज्य सरकारने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. हा प्रकार केवळ आर्थिक फसवणुकीचा नसून संघटित गुन्हेगारीचे स्वरूप धारण करणारा असल्याचे स्पष्ट होत आहे.**

याच पार्श्वभूमीवर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत पोलीस आणि मुद्रांक विभागाने संयुक्त टास्क फोर्स स्थापन करून कारवाईचा कार्यपूर्ती अहवाल मंगळवारपर्यंत मंत्रिमंडळासमोर सादर करण्याचे आदेश देण्यात आले. बैठकीला इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, मुद्रांक महानिरीक्षक रविंद्र बिनवडे, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी विनय गौडा, पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, जालनाचे पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### खोटी वारस प्रमाणपत्रे, बनावट खरेदीखते आणि दुबार विक्रीचे जाळे

प्राथमिक तपासात छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील काही दुय्यम निबंधक कार्यालयांमधून बनावट खरेदीखते, खोटी वारस प्रमाणपत्रे, दस्तांमध्ये फेरफार, शासनाची फसवणूक, दुबार विक्री आणि बनावट कागदपत्रांच्या आधारे जमीन व्यवहार झाल्याचे समोर आले आहे. या सर्व प्रकरणांमागे कार्यरत असलेल्या संघटित साखळीचा शोध घेऊन सूत्रधारांपर्यंत पोहोचण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दोषींना कठोर शिक्षा होईल यासाठी तपासाची व्याप्ती वाढविण्यात येणार असल्याचे संकेत बैठकीत देण्यात आले.

### कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून बनावट दाखले ?

महसूल मंत्री बावनकुळे यांनी या प्रकरणातील एक अत्यंत गंभीर बाब उघड केली. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून बनावट दाखले तयार करण्यात आले, तसेच बनावट व्यक्ती उभ्या करून दस्त नोंदणीद्वारे शासनाची दिशाभूल करण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. यामुळे हा घोटाळा केवळ महसूल विभागापुरता मर्यादित नसून सायबर आणि संघटित गुन्हेगारीच्या चौकटीतूनही तपासला जाण्याची शक्यता आहे.

### मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानंतर यंत्रणा अलर्ट...

मंत्री अतुल सावे यांनी हा विषय मंत्रिमंडळ बैठकीत मांडल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने कारवाईचे निर्देश दिले होते. त्यानुसार महसूल विभागाने संबंधित यंत्रणांची संयुक्त बैठक घेऊन कठोर भूमिका स्पष्ट केली आहे.

### आतापर्यंत १६ गुन्हे दाखल ?

या प्रकरणात आतापर्यंत १६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मात्र केवळ गुन्हे दाखल करून थांबता कामा नये, तर संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी भूमिका सरकारने घेतली आहे. मंत्री अतुल सावे यांनी संबंधित आरोपींवर अजामिनपात्र गुन्हे दाखल करून आवश्यकता भासल्यास मोका किंवा तडीपार सारख्या कठोर उपाययोजनांचा विचार करण्याची मागणी केली आहे.

### बीडसह मराठवाडा आणि राज्य ही रडारवर ?

संभाजीनगर आणि जालना येथे एवढ्या मोठ्या प्रमाणात बनावट दस्त नोंदणीचे प्रकार उघडकीस आल्यामुळे आता प्रशासनाचे लक्ष मराठवाड्यातील इतर जिल्ह्यांकडे वळले आहे.विशेषतः बीड, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यांमध्येही अशाच प्रकारची साखळी कार्यरत होती का, याची सखोल चौकशी करण्याची गरज व्यक्त होत आहे. महसूल आणि मुद्रांक विभागाने व्यापक तपास मोहीम राबविल्यास आणखी अनेक धक्कादायक प्रकरणे समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शासनाने संपूर्ण मराठवाड्यासह राज्यात विशेष लेखापरीक्षण आणि चौकशीचे आदेश देण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

### खोटी कागदपत्रे, खरे मालक गायब

एआयच्या मदतीने बनावट दाखले तयार करून खरे मालक गायब करण्यात आले आहे आणि परस्पर दुसरेच मालक कागदपत्रे तयार करण्यात आले आहेत या साखळी घोटाळ्यामध्ये करोडो नव्हे तर अब्जावधीचा घोटाळा झालेला असण्याची शक्यता आहे त्यामुळे खरे जंगम मालमत्तेचे मालक हादरले आहेत. त्यामुळे जमीन व्यवहारातील महास्कॅमची चौकशी सुरू करणे गरजेचे आहे.

## शहीद विक्रम चव्हाण यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार






कोल्हापूर । प्रतिनिधी

**जम्मू-काश्मीरमधील उरी सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेजवळ झालेल्या एका भीषण स्फोटात भारतीय लष्कराचे दोन जवान शहीद झाले. यामध्ये कोल्हापूर जिल्ह्याचे नाव देशपातळीवर उंचावणारे शाहूवाडी तालुक्यातील गोंडोली गावचे सुपुत्र वीर जवान विक्रम बाळकृष्ण चव्हाण यांना वीरमरण आले. या वीर सुपुत्राच्या पार्थिवावर आज गोंडोली येथील वारणा नदीच्या तीरावर शासकीय इतमामात आणि साश्रू नयनांनी अंत्यसंस्कार करण्यात आले.**

या दुःखद प्रसंगी आमदार विनय कोरे, जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅसमिन, प्रांताधिकारी समीर शिंगटे, तहसीलदार सीमा सोनवणे, सभापती प्रियांका भोसले यांच्यासह विविध पदाधिकारी, सैन्यदलाचे अधिकारी, लोकप्रतिनिधी, जिल्ह्यातील माजी सैनिक आणि ◀◀ पान २ वर

## अवैध मालवाहतूक करणाऱ्या वाहनांविरुद्ध विशेष तपासणी मोहीम



बीड । प्रतिनिधी

**परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या निर्देशानुसार राज्यभरात अतिभारित तसेच अवैध मालवाहतूक करणाऱ्या वाहनांविरुद्ध ८ ते १९ जून २०२६ या कालावधीत विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे.**

या मोहिमे अंतर्गत उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, अंबाजोगाई येथे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, यवतमाळ येथील दोन विशेष तपासणी पथके दाखल झाली असून अंबाजोगाई कार्यक्षेत्रातील सहा तालुक्यांमध्ये विशेष वाहन तपासणी मोहीम सुरू करण्यात आली आहे. मोहिमेदरम्यान निर्धारित वहन क्षमतेपेक्षा अधिक मालवाहतूक ◀◀ पान २ वर

## सिंगापूर-हाँगकाँगच्या धर्तीवर धारावीचा पुनर्विकास करण्यात येणार-मुख्यमंत्री

### धारावीत उभारला जाणार देशातील पहिला मल्टी-मोडल ट्रान्सपोर्ट हब




मुंबई । प्रतिनिधी

**सिंगापूर आणि हाँगकाँगमधील आधुनिक गृहनिर्माण प्रकल्पांच्या धर्तीवर धारावीचा पुनर्विकास करण्यात यावा. मात्र, हा प्रकल्प राबविताना धारावीतील नागरिक, त्यांची उपजीविका आणि स्थानिक वैशिष्ट्ये यांना केंद्रस्थानी ठेवण्यात यावे. ठरलेल्या कालावधीतच प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात यावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे दिले.**

#### देशातील पहिला मल्टी-मोडल ट्रान्सपोर्ट हब...

धारावी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत देशातील पहिला अत्याधुनिक मल्टी-मोडल ट्रान्सपोर्ट हब उभारण्यात येणार आहे. या केंद्रातून पश्चिम, मध्य आणि हार्बर रेल्वेसह विविध मेट्रो मार्ग एकमेकांशी जोडले जाणार आहेत. भविष्यात बुलेट ट्रेनची जोडणीही धारावीपर्यंत आणण्याचा विचार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.या केंद्रात विमान प्रवाशांसाठी 'सिटी चेक-इन' सुविधा उपलब्ध असेल. सिंगापूर आणि हाँगकाँगप्रमाणे जागतिक दर्जाच्या सुविधा येथे उपलब्ध करून देण्याचा मानस असल्याचे सादरीकरणात सांगण्यात आले.

#### १० वर्षांत प्रकल्प पूर्ण करण्याचे लक्ष्य..

धारावीतील पुनर्वसन इमारतींचे काम ४२ महिन्यांत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. माटुंगा परिसरातील पुनर्वसनासाठी ३९ महिन्यांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील काम मार्च २०२८ पर्यंत पूर्ण करून हस्तांतरित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृहात धारावी पुनर्विकास प्रकल्पाची आढावा बैठक झाली. बैठकीस मुंबईच्या महापौर रितू तावडे, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, अदानी समूहाचे व्यवस्थापकीय संचालक प्रणव अदानी, व्यवस्थापकीय संचालक अनिल सरदाना, अजित बारोडिया तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. श्री. सरदाना यांनी यावेळी प्रकल्पाचे सादरीकरण केले. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, गृहनिर्माण विभागाचे अपर मुख्य सचिव असीमकुमार ◀◀ पान २ वर



## पदक प्राप्त खेळाडूंचा जिल्हाधिकारी यांच्या हस्ते सत्कार

कोल्हापूर । प्रतिनिधी

**भारतीय संस्कृतीत योगाला असलेले महत्त्व यामध्ये, पहिल्या जागतिक योगासन स्पर्धेमध्ये कोल्हापूरच्या खेळाडूंनी मिळवलेले यश हे अत्यंत कौतुकास्पद आहे. खेळामध्ये कोल्हापूर अग्रगण्य राहील यासाठी खेळाडूंना आवश्यक त्या पायाभूत सुविधा व सहकार्य करण्यात येईल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी जागतिक योगासन स्पर्धेमध्ये पदकप्राप्त विजेत्यांच्या सत्कार प्रसंगी केले.**

४ ते ८ जून दरम्यान ट्रांस स्टडिया स्टेडीयम, अहमदाबाद (गुजरात) येथे संपन्न झालेल्या पहिल्या जागतिक योगासन स्पोर्ट्स चॅम्पियन स्पर्धेमध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील तीन खेळाडूंची ◀◀ पान २ वर

## वृक्ष लागवडीसाठी काटेकोर नियोजन करावे-जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन



बीड । प्रतिनिधी

राष्ट्रीय वन धोरण १९८८ च्या उद्दिष्टानुसार राज्याचे वनाच्छादन आणि वृक्षाच्छादन सन २०४७ पर्यंत एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्क्यांपर्यंत वाढविण्यासाठी संपूर्ण राज्यात ३०० कोटी वृक्षारोपण अभियान राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर, बीड जिल्ह्यामध्ये आगामी २०२६ च्या पावसाळ्यासाठी प्रशासनाने विभागनिहाय वृक्ष लागवडीचे विशेष उद्दिष्ट निश्चित केले असून, संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांनी वृक्ष लागवडीसाठी जमिनीच्या उपलब्धतेचे काटेकोर नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बैठकीत दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील ◀◀ पान २ वर

## अधिनियम २०१६ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता




मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील नवीन महाविद्यालयांना अंतिम मान्यता, विस्तारीकरणात नवीन विद्याशाखा, अभ्यासक्रम व नवीन विषय, तुकडी आदी विषयांना अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम २०१६ मध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.**

या निर्णयानुसार या अधिनियमातील तरतुदीनुसार नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था चालू करण्यास तसेच त्यांना परवानगी देण्यास ३० जून, २०२६ ची मुदत राहणार आहे. या अधिनियम, २०१६ मधील प्रस्तावित ◀◀ पान २ वर

## अग्रलेख....

### कर्जमाफी शेतकऱ्यांच्या अपेक्षा, सरकारची भूमिका आणि विरोधकांचा आक्षेप...

महाराष्ट्रातील शेती आजही मोठ्या प्रमाणावर पावसावर अवलंबून आहे. अवकाळी पाऊस, दुष्काळ, उत्पादन खर्चातील वाढ, बाजारभावातील अनिश्चितता आणि वाढते कर्ज या संकटांच्या विळख्यात शेतकरी अडकलेला आहे. अशा परिस्थितीत राज्य सरकारकडून कर्जमाफीची कोणतीही घोषणा झाली की शेतकरी वर्गात आशेचा किरण निर्माण होतो. मात्र अलीकडे जाहीर झालेल्या कर्जमाफीच्या संदर्भात विरोधी पक्षांनी ती फसवी, अपूर्ण आणि दिशाभूल करणारी असल्याचा आरोप करत राज्यभर आंदोलनाची भूमिका घेतली आहे. या पार्श्वभूमीवर या विषयाकडे भावनिक नव्हे तर वस्तुनिष्ठ आणि वैचारिक दृष्टीने पाहण्याची गरज आहे.

कर्जमाफी हा विषय महाराष्ट्रासाठी नवीन नाही. गेल्या दोन दशकांत विविध सरकारांनी वेगवेगळ्या स्वरूपात कर्जमाफी योजना राबवल्या आहेत. काही योजनांचा लाखो शेतकऱ्यांना लाभ झाला, तर काही योजनांमध्ये पात्रता निकष, तांत्रिक अडचणी आणि प्रशासकीय त्रुटींमुळे अनेक शेतकरी वंचित राहिल्याच्या तक्रारी पुढे आल्या. त्यामुळे कोणतीही नवीन कर्जमाफी जाहीर होताच तिच्या अंमलबजावणीबाबत प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

विरोधकांचा मुख्य आक्षेप असा आहे की, सरकारने केलेली घोषणा आणि प्रत्यक्ष लाभार्थींची संख्या यामध्ये मोठी तफावत आहे. अनेक शेतकरी पात्रतेच्या निकषांमुळे योजनेबाहेर राहू शकतात, तर काहींच्या मते ही घोषणा आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय हेतूने करण्यात आली आहे. विरोधकांचा आरोप कितपत योग्य आहे, याचे अंतिम उत्तर प्रत्यक्ष अंमलबजावणी झाल्यानंतरच मिळू शकेल. मात्र लोकशाहीत विरोधकांना सरकारला प्रश्न विचारण्याचा आणि जनतेसमोर वास्तव मांडण्याचा पूर्ण अधिकार आहे.

दुसरीकडे सरकारचे म्हणणे असे आहे की, राज्याच्या आर्थिक मर्यादा लक्षात घेऊनच निर्णय घेण्यात आले आहेत. कोणतीही व्यापक कर्जमाफी राज्याच्या तिजोरीवर हजारो कोटी रुपयांचा बोजा टाकू शकते. त्यामुळे आर्थिक शिस्त आणि शेतकरी हित यामध्ये समतोल साधण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचा सरकारचा दावा आहे. शासनाच्या भूमिकेचाही वस्तुनिष्ठ विचार करणे आवश्यक आहे.

खरा प्रश्न मात्र कर्जमाफीच्या पलीकडे आहे. कर्जमाफी हा कायमस्वरूपी उपाय नाही. ती तात्पुरता दिलासा देऊ शकते; परंतु शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ, हमीभावाची प्रभावी अंमलबजावणी, सिंचन सुविधा, पीकविमा योजनांची पारदर्शकता, साठवणूक व्यवस्था आणि कृषी प्रक्रिया उद्योगांची उभारणी याशिवाय शेतीसमोरील मूलभूत समस्या सुटणार नाहीत. वारंवार कर्जमाफी जाहीर करण्याची वेळ येत असेल, तर त्याचा अर्थ शेती व्यवस्थेतील मूलभूत त्रुटी अद्याप कायम आहेत.

याचबरोबर शेतकरी आणि सरकार यांच्यातील विश्वास टिकवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. कोणतीही घोषणा करताना तिची अंमलबजावणी, पात्रता निकष, कालमर्यादा आणि लाभार्थींची स्पष्ट माहिती सार्वजनिक करणे आवश्यक आहे. अस्पष्टता राहिली की गैरसमज निर्माण होतात आणि राजकीय वादाला खतपाणी मिळते.

आज महाराष्ट्रातील शेतकरी केवळ घोषणांची वाट पाहत नाही; त्याला प्रत्यक्ष मदत, शाश्वत धोरण आणि विश्वासार्ह शासन हवे आहे. त्यामुळे कर्जमाफीच्या मुद्द्यावर सत्ताधारी आणि विरोधक दोघांनीही राजकीय आरोप–प्रत्यारोपांच्या पलीकडे जाऊन शेतकरीहिताला केंद्रस्थानी ठेवणे गरजेचे आहे. कारण शेवटी प्रश्न कोणाचा विजय होतो याचा नसून, महाराष्ट्राच्या अन्नदात्याला न्याय मिळतो का याचा आहे.

# विकसित महाराष्ट्र - २०४७ साठी सर्वसमावेशक मानवी विकासासाठी राज्याचे विशेष प्रयत्न-मुख्यमंत्री फडणवीस

## नवी दिल्लीत नीती आयोगाच्या बैठकीत महाराष्ट्राचे व्हिजन सादर

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे २०४७ पर्यंत विकसित भारत घडविण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी शिक्षण, आरोग्य, कौशल्य विकास, महिला सक्षमीकरण आणि सर्वसमावेशक मानवी विकास या पाच प्रमुख बाबींवर महाराष्ट्र शासन विशेष भर देत आहे. राज्याच्या आर्थिक प्रगतीसोबतच समतोल व सर्वसमावेशक विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्व क्षेत्रात व्यापक प्रयत्न करण्यात येत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.**

राष्ट्रपती भवनातील सांस्कृतिक केंद्रात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नीती आयोगाच्या नियामक मंडळाच्या अकराव्या बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या सर्वसमावेशक विकासाचा रोडमॅप सादर केला. या बैठकीस केंद्रीय मंत्री, विविध राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्रशासित प्रदेशांचे उपराज्यपाल, नीती आयोगाचे उपाध्यक्ष अशोककुमार लाहिडी आणि सदस्य उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी विकसित भारत २०४७ साठी महाराष्ट्र शासनाची कटिबद्धता व्यक्त करत केंद्र सरकार आणि सर्व राज्यांच्या सहकार्याने देशाला समृद्ध, आत्मनिर्भर आणि न्याय्य राष्ट्र बनविण्याचा संकल्प व्यक्त केला.




## शाळांमध्ये विशेष आधार शिबिरांचे आयोजन करावे–जिल्हाधिकारी जॉन्सन




बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात आगामी १५ जूनपासून नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होत आहे. या पार्श्वभूमीवर शाळा सुरू होताच विद्यार्थ्यांच्या आधार नोंदणी आणि अद्ययावतीकरणासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी परस्परांशी समन्वय ठेवून विशेष शिबिरांचे आयोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय आधार नोंदणी समितीची बैठक पार पडली. याप्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, विस्तार अधिकारी आर.सी. खोड, जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक महेश गोले, महाआयटीचे जिल्हा समन्वयक मनोजकुमार गुंड यांची प्रमुख तर आधार प्राधिकरणाचे उपसंचालक मंदार जेवरे, कुलदीपसिंग गेहलोत यांची ऑनलाईन उपस्थिती होती.

## राष्ट्रपतींच्या हस्ते शहीद जवान प्रवीण जंजाळ यांना मरणोत्तर 'कीर्ती चक्र' प्रदान

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**महाराष्ट्रातील अकोला जिल्ह्यातील मोरगाव भाकरे येथील रहिवासी तथा महार रेजिमेंटच्या पहिल्या बटालियन, राष्ट्रीय रायफल्सचे शिपाई प्रवीण प्रभाकर जंजाळ यांना काश्मीर खोऱ्यात दहशतवाद्यांविरुद्ध लढताना दाखविलेल्या अद्वितीय शौर्य आणि सर्वोच्च बलिदानाबद्दल मरणोत्तर 'कीर्ती चक्र' प्रदान करण्यात आले.**



राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रपती भवनात आयोजित विशेष 'रक्षा अलंकरण' सोहळयात हा सन्मान प्रदान करण्यात आला. शहीद जवान प्रवीण जंजाळ यांच्या वतीने त्यांच्या पत्नी श्रीमती श्यामबाला जंजाळ आणि आई श्रीमती शाहू प्रभाकर जंजाळ यांनी राष्ट्रपतींच्या हस्ते हा प्रतिष्ठेचा पुरस्कार स्वीकारला.या सोहळयास उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह तसेच अन्य केंद्रीय मंत्री, वरिष्ठ लष्करी अधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.

### वस्तू व सेवा कर अधिनियम २०१७ मध्ये सुधारणा

मुंबई । प्रतिनिधी

केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम २०१७ मधील तरतुदींशी सुसंगत आणि सुसूत्रतेसाठी महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम २०१७ मध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

वस्तू व सेवा कर परिषदेच्या ५६ व्या बैठकीमध्ये भारत सरकारने केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ च्या विविध कलमांमध्ये सुधारणा केलेल्या आहेत. या तरतुदींशी सुसंगत आणि सुसूत्र अशा सुधारणा करण्यास आज झालेल्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

## राज्यातील आरोग्य यंत्रणेच्या बळकटीसाठी मंत्री प्रकाश आबिटकर यांची नवी दिल्लीत उच्चस्तरीय बैठक

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी नवी दिल्लीत राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या (एनएचएम) केंद्रीय अतिरिक्त सचिव व व्यवस्थापकीय संचालक आराधना पटनाईक (भाप्रसे.) यांची कर्तव्य भवनमध्ये भेट घेतली. २०२६–२७ च्या कार्यक्रम अंमलबजावणी आराखड्यांतर्गत (पीआयपी) निधी मंजुरी तसेच अतिरिक्त निधीच्या मागणीसाठी ही बैठक महत्त्वाची ठरली.

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत (आरबीएसके) कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रियेसाठी लाभार्थी बालकांची वयोमर्यादा दोन वर्षांवरून पाच वर्षांपर्यंत वाढविण्यास या बैठकीत तत्त्वतः मान्यता देण्यात आली. या महत्वपूर्ण निर्णयामुळे राज्यातील अधिकाधिक मुलांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे.

## प्रधानमंत्री मोदी यांच्या नेतृत्वात महाराष्ट्राच्या विकासाला नवी दिशा– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**नव्या आत्मनिर्भर भारताच्या उभारणीमध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे स्थान अढळ असून त्यांच्या बारा वर्षांच्या कारकिर्दीत महाराष्ट्राच्याही विकासाला नवी क्रांतिकारी दिशा मिळाली, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.**




देशाचे निर्वाचित प्रधानमंत्री म्हणून सर्वाधिक काळ सलग सेवा देण्याचा ४ हजार ३९९ दिवसांचा ऐतिहासिक टप्पा पूर्ण केल्याबद्दल मोदी यांचे मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राच्या वतीने अभिनंदन केले आहे.मुख्यमंत्र्यांनी नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदनात माध्यमांशी संवाद साधला त्यावेळी ते बोलत होते.

### औद्योगिक विकास महामंडळाच्या कर्ज उभारणीच्या अधिकारात वाढ

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कर्ज उभारणीच्या अधिकारात वाढ करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ मध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला पुरंदर विमानतळ जमीन संपादनासाठी हुडकोकडून ६ हजार कोटींचे कर्ज घेण्यास शासनाने मान्यता व शासन हमी दिली आहे.

## संभाव्य पूरस्थितीवर मात करण्यासाठी प्रशासन सज्ज-जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष



### कृष्णाकाठी आपत्ती व्यवस्थापनाची रंगीत तालीम संपन्न

सांगली । प्रतिनिधी

सांगली जिल्ह्यात संभाव्य आपत्तीच्या काळात तातडीने प्रतिसाद देता यावा, यासाठी आपत्ती व्यवस्थापन कक्षामार्फत उपलब्ध असलेल्या सर्व साधनसामग्रीचा आढावा घेण्यात आला असून, पूरस्थितीच्या संभाव्य आव्हानावर मात करण्यासाठी प्रशासन सज्ज आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी आज येथे केले. आगामी पावसाळा आणि संभाव्य पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर सांगली जिल्हा प्रशासन व सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेची व्यापक रंगीत तालीम आयर्विन पूल, कृष्णा नदी येथे घेण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी महानगर पालिका आयुक्त संजीता महापात्र, अतिरिक्त आयुक्त राहुल रोकडे, मिरज तहसीलदार डॉ. अपर्णा मोरे–धुमाळ, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी रफिक नदाफ यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालय, महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# लातूर जिल्ह्यात खत आणि बियाण्यांचा पुरेसा साठा उपलब्ध

**लातूर । प्रतिनिधी**

**सध्या जिल्ह्यात खरीप हंगामाची पूर्वतयारी वेगाने सुरू असून शेतकऱ्यांची खत व बियाणे खरेदी करण्यासाठी लगबग सुरू आहे. या पार्श्वभूमीवर, लातूर जिल्ह्यामध्ये पुरेशा प्रमाणात खत आणि बियाण्यांचा साठा उपलब्ध असल्याने शेतकऱ्यांनी कोणतीही धावपळ करू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले आहे. जमिनीमध्ये ८० ते १०० मि.मी. पाऊस पडून पुरेशा प्रमाणात ओलावा तयार झाल्याशिवाय शेतकऱ्यांनी घाईघाईने पेरणी करू नये, तसेच खत खरेदी करताना केवळ एका विशिष्ट खताच्या ग्रेडचाच आग्रह धरू नये, असेही त्यांनी म्हटले आहे.**

### साठेबाजी किंवा लिंकिंग करणाऱ्या विक्रेत्यांवर होणार सक्त कारवाई.. !

जिल्ह्यातील सर्व कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी खते व बियाण्यांची विक्री छापील किमतीपेक्षा (एमआरपी) जास्त दराने करू नये, तसेच खत किंवा बियाण्यांसोबत इतर नको असलेल्या निविष्ठांची सक्तीने विक्री (लिंकिंग) करू नये. खताचा साठा उपलब्ध असूनही शेतकऱ्यांना देण्यास टाळाटाळ केल्यास किंवा बेकायदेशीर साठेबाजी केल्यास संबंधित विक्रेत्यांवर तात्काळ व सक्त कारवाई करण्यात येईल, असा इशाराही जिल्हाधिकाऱ्यांनी दिला आहे.

## धर्मादाय विभागाच्या कार्यालयीन भोजन वेळेत बदल

### भोजनासाठी आता राज्यात एकच वेळ

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

**मुंबई मुख्यालय तसेच पुणे येथील धर्मादाय कार्यालयाची भोजनाची वेळ दुपारी १.३० ते २ अशी आहे.शासन परिपत्रकात नमूद केलेली वेळ आणि विभागीय कार्यालयांची भोजनाची वेळ यामध्ये विसंगती दिसून येत होती. त्यामुळे कार्यालयीन कामकाजामध्ये सुसूत्रता व समन्वय साधण्यासाठी या आदेशान्वये कोल्हापूर कार्यालय तसेच अधिनस्त सांगली, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग येथील अधिकारी व कर्मचारी यांच्या भोजनाची वेळ दुपारी १.३० ते २ वाजेपर्यंत निश्चित करण्यात आली असल्याची माहिती सहाय्यक धर्मादाय आयुक्त प्रियांगिनी पाटील यांनी दिली आहे.**

मुंबई मुख्यालय, पुणे, कोल्हापूर तसेच अधिनस्त सांगली, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग येथील अधिकारी व कर्मचारी यांच्या भोजनाच्या वेळेत तफावत असल्याने, महत्त्वाच्या कामकाजासंदर्भातील माहितीची देवाणघेवाण करताना अडचणी निर्माण होत होत्या. मुंबई मुख्यालय, पुणे व अधिनस्त कार्यालयांकडून माहिती प्राप्त करून घेणे तसेच कोल्हापूर विभागातील माहिती संबंधित कार्यालयांना पाठविणे यामध्ये व्यत्यय येत होता.या निर्णयामुळे आता कामकाजात सुसूत्रता येणार आहे.

## बँकांनी पीक कर्जाचे उद्दिष्ट पूर्ण करावे – जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष



**सांगली । प्रतिनिधी**

**बँकांनी त्यांच्याकडे पीक कर्जासाठी आलेली प्रकरणे तातडीने मार्गी लावावीत. प्रस्तावात काही त्रुटी असतील त्याची पूर्तता संबंधितांकडून करून घ्यावी व पीक कर्जाचे दिलेले उद्दिष्ट पूर्ण करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी आज येथे दिल्या.**

जिल्हास्तरीय सल्लागार समितीच्या बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या बैठकीस बँक ऑफ इंडिया कोल्हापूर विभागाचे विभागीय व्यवस्थापक हितेंद्रनाथ श्रीवास्तव, जिल्हा परिषद जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक नंदिनी घाणेकर, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक निखील सावळे, सोलापूर जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक विश्वास वेताळ, नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक निलेश चौधरी, जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक विद्या कुलकर्णी, सहाय्यक निबंधक अनुराधा काटकर, ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थेचे संचालक महेश पाटील यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## पान १ वरून....

### अवैध मालवाहतूक करणाऱ्या

करणारी तसेच मोटार वाहन कायदा व नियमांचे उल्लंघन करणारी वाहने आढळून आल्यास संबंधित वाहनांवर नियमानुसार दंडात्मक व कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हर्षल डाके यांनी दिली.

-----------

### शहीद विक्रम चव्हाण यांच्यावर

पंचक्रोशीतील हजारो नागरिक या वीर सुपुत्राला साश्रू नयनांनी निरोप देण्यासाठी उपस्थित होते. विक्रम चव्हाण यांच्या निधनाने चव्हाण कुटुंबातील कमावता आणि हसताखेळता आधार हिरावला गेल्याने संपूर्ण परिसरातून तीव्र हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात वृद्ध वडील, मोठा भाऊ, तीन विवाहित बहिणी, पत्नी आणि अवघ्या तीन वर्षांची चिमुकली मुलगी वीरा असा परिवार आहे. अंत्यसंस्कारावेळी चिमुकल्या वीराच्या आणि पत्नीच्या आक्रोशाने उपस्थित असलेल्या प्रत्येक नागरिकाचे डोळे पाणावले होते.

-----------

### पदक प्राप्त खेळाडूंचा

भारतीय संघात निवड झाली होती. या स्पर्धेत सीनियर ब गटात सुपाईन या प्रकारात रोहित चव्हाण याने तर ज्युनिअर गटात वृंदा भुतडा हिने फॉरवर्ड बेंडिंग व निवेष पाटील याने सब ज्युनिअर गटात फॉरवर्ड बेंडिंग व पारंपरिक सांघिक स्पर्धेत सहभाग घेतला होता. या स्पर्धेत वृंदा भुतडा हिने सुवर्णपदक, निवेश पाटील याने दोन सुवर्णपदक तसेच रोहित चव्हाण याने रौप्यपदक संपादन केले. स्पर्धेत प्राविण्य प्राप्त खेळाडू व त्यांचे प्रशिक्षक राज्य क्रीडा मार्गदर्शक रविभुषण कुमठेकर व सुहास पवळे यांचा सत्कार जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी क्रीडा व युवक सेवा, कोल्हापूर विभागाचे उपसंचालक सुहास पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी विद्या शिरस, कोल्हापूर जिल्हा गुरुप्रसाद योग परिषद, इचलकरंजी व सरदार तालीम मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

-----------

### सिंगापूर–हॉंगकॉंगच्या धर्तीवर धारावीचा

गुप्ता, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ पी गुप्ता, अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे, सचिव (नियोजन) शैला ए, बृहन्मुंबई महापालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे, एमएमआरडीए चे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल, विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल, जिल्हाधिकारी आंचल गोयल यांच्यासह विकासकाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

-----------

### अधिनियम २०१६ मध्ये सुधारणा

मुदतवाढ कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांना देखील लागू राहणार आहे.

--------

### वृक्ष लागवडीसाठी काटेकोर नियोजन

जिल्हा नियोजन सभागृहात वर्ष २०२६ च्या पावसाळ्यातील वृक्ष लागवड कार्यक्रमाबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला उपजिल्हाधिकारी प्रभुदय मुळे, विभागीय वन अधिकारी एस.एम. लखमावाड, प्रादेशिक अधिकारी ए.डी.गरकल यांची प्रमुख उपस्थिती होती.बीड जिल्ह्यात वृक्ष लागवड मोहिमेसाठी सद्यस्थितीत मोठ्या प्रमाणावर रोपनिर्मिती करण्यात आली आहे. यामध्ये सामाजिक वनीकरण विभागाकडे २० लक्ष तर प्रादेशिक वनविभागाकडे ९.५० लक्ष अशी एकूण २९.५० लक्ष रोपे सध्या उपलब्ध असल्याची माहिती उपवनसंरक्षक बिराजदार यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे बैठकीत दिली.

------------

## महाराष्ट्र शासनाचे महत्त्वपूर्ण निर्णय...

### प्रशासन, उद्योग आणि पायाभूत सुविधांना नवी गती

मुंबई । विशेष प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या महाराष्ट्र मंत्रिमंडळ बैठकीत प्रशासन, उद्योग, शिक्षण आणि पायाभूत सुविधांशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण निर्णयांना मंजुरी देण्यात आली. या निर्णयांमुळे राज्यातील विकासकामांना गती मिळण्यासह प्रशासन अधिक कार्यक्षम होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




### मंत्रालयीन विभागांची मोठी पुनर्रचना..

मुंबई – राज्य शासनाने प्रशासनातील कार्यक्षमता वाढविण्यासाठी मंत्रालयातील विभागांची पुनर्रचना करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. यानुसार विभागांची संख्या ३३ वरून ४५ करण्यात येणार असून निर्णय प्रक्रियेला गती मिळणार आहे. कृषी, उद्योग, शिक्षण, महसूल, पर्यटन यांसारख्या मोठ्या विभागांचे स्वतंत्र विभाजन करण्यात येणार आहे.



### एमआयडीसीला वाढीव आर्थिक अधिकार

मुंबई – राज्यातील औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ एमआयडीसी च्या कर्ज उभारणी क्षमतेत वाढ करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. यामुळे एमआयडीसीला रोखे, बँक कर्ज आणि इतर वित्तीय स्रोतांद्वारे मोठ्या प्रमाणावर निधी उभारता येणार असून नवीन औद्योगिक प्रकल्पांना गती मिळणार आहे.




### मुंबई महानगर क्षेत्रातील २२,६११ कोटींच्या वाहतूक प्रकल्पांना मंजुरी

मुंबई – मंत्रिमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीने नवी मुंबई मेट्रो विस्तार आणि घोडबंदर–भाईंदर बोगदा प्रकल्पासह तब्बल २२,६११ कोटींच्या प्रकल्पांना हिरवा कंदील दिला. यामुळे मुंबई, ठाणे आणि नवी मुंबई परिसरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे.



### नागपूर–चंद्रपूर द्रुतगती मार्गासाठी निधी

नागपूर – राज्य सरकारने नागपूर–चंद्रपूर प्रवेश नियंत्रित द्रुतगती मार्गासाठी जमीन संपादन निधीला मंजुरी दिली आहे. सुमारे २१,७०२ कोटींच्या या प्रकल्पामुळे विदर्भातील औद्योगिक आणि वाहतूक विकासाला मोठी चालना मिळणार आहे.




### विद्यापीठ आणि जीएसटी कायद्यात सुधारणा

मुंबई – महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम आणि महाराष्ट्र जीएसटी अधिनियमात सुधारणा करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. यामुळे नवीन महाविद्यालयांना मान्यता देण्याची प्रक्रिया सुलभ होणार असून करप्रणाली अधिक सुसंगत होणार आहे.

## एकल महिला धोरण उपक्रमात सहभागी व्हा–आयुक्तालय पुणे

रायगड–अलिबाग । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासन राज्यातील विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता, अविवाहित तसेच इतर एकल महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी स्वतंत्र एकल महिला धोरण तयार करीत आहे. हे धोरण अधिक व्यापक, लोकाभिमुख आणि परिणामकारक व्हावे यासाठी राज्यातील एकल महिला, नागरिक, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक, संशोधक आणि विषयतज्ज्ञ यांच्याकडून सूचना व अभिप्राय मागविण्यात येत आहेत. राज्यातील सर्व नागरिक, स्वयंसेवी संस्था, महिला संघटना, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक व विषयतज्ज्ञ यांनी या महत्त्वपूर्ण उपक्रमात सहभागी होऊन शासनास सहकार्य करावे, असे आवाहन महिला व बाल विकास आयुक्तालय पुणे यांनी केले आहे.

# महाराष्ट्र रेल्वे फाटकमुक्त होण्यासाठी पायाभूत सुविधा उभारा–मुख्यमंत्री

## रेल्वेच्या ६५ पायाभूत सुविधांच्या कामांना मान्यता



मुंबई । प्रतिनिधी

'महाराष्ट्र रेल्वे पायाभूत सुविधा विकास महामंडळा'मार्फत (महारेल) करण्यात येणाऱ्या एकूण १३१ पैकी पहिल्या टप्प्यात ६५ कामांना मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या 'महारेल'च्या बैठकीत मान्यता देण्यात आली. महाराष्ट्रात रेल्वे फाटकमुक्त होण्यासाठी पायाभूत सुविधा उभारण्यात याव्यात, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले.

सह्याद्री अतिथिगृहात ही बैठक झाली. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी दूरदृष्य संवाद प्रणालीद्वारे बैठकीत सहभाग घेतला. सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री इंद्रनील नाईक व आमदार प्रसाद लाड बैठकीस उपस्थित होते. राज्यातील सार्वजनिक बांधकाम आणि नगरविकास विभागाच्या अखत्यारीत असलेल्या रस्त्यांवर रेल्वे उड्डाण पूल, पादचारी पूल आणि रेल्वे मार्गाखालील (अंडर पास) रस्त्याची कामे महारेलमार्फत करण्यात येणार आहेत. त्याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा झाली. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी विविध निर्देश दिले. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांनी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे बैठकीत सहभाग घेतला. हुडकोचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक संजय कुलश्रेष्ठ, अपर मुख्य सचिव (नगर विकास) असीम कुमार गुप्ता, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी. गुप्ता, अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे, सचिव (नियोजन) शैला ए आदी यावेळी उपस्थित होते. महारेलचे व्यवस्थापकीय संचालक राजेश कुमार जयस्वाल यांनी बैठकीत सादरीकरण केले.

### प्रस्तावित रेल्वे पायाभूत सुविधांची कामे

मुंबई महानगर क्षेत्र– १७, पुणे शहर– १५, नागपूर– १३, नाशिक– ५, अमरावती– ५, सांगली– ४, छत्रपती संभाजीनगर– ३, कोल्हापूर– ३, धुळे– ३, लातूर– ३, परभणी– ३, सोलापूर– २, जळगाव– २, अहिल्यानगर– १ आणि नांदेड शहरात– १. एकूण– ८०.

## इयत्ता १०वी, १२वी पुरवणी परीक्षा, ५८११ विद्यार्थ्यांसाठी २४ केंद्रांवर सज्जता

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

**इयत्ता १० वी व १२ वी म्हणजेच माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेतील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये म्हणून लगेच पुरवणी परीक्षा घेण्यात येते. यंदा ही परीक्षा १६ जून ते ८ जुलै या कालावधीत होणार आहे. या परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी जिल्हास्तरीय दक्षता समितीची बैठक आज पार पडली.**

जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., शिक्षणाधिकारी (माध्य.) श्रीमती आश्विनी लाठकर, शिक्षणाधिकारी (प्राथ.) जयश्री चव्हाण, सर्व गटशिक्षणाधिकारी, पोलीस दलाचे अधिकारी आदी यावेळी उपस्थित होते. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम. ह्या दुरदृष्यप्रणालीद्वारे सहभागी झाल्या होत्या.

## जनसमाधान बैठकीतील अर्जदारांच्या विविध विषयांच्या समस्या तात्काळ सोडवा–जिल्हाधिकारी रोहन घुगे



जळगाव । प्रतिनिधी

**जनतेच्या प्रश्नांचे निवारण करणे हेच प्रशासनाचे ध्येय असून जनसमाधान बैठकीत प्राप्त होणाऱ्या नागरिकांच्या विविध विषयांवरील समस्यांचे अर्ज संबंधित विभागांनी तात्काळ निकाली काढावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी दिले.**

नागरिकांच्या तक्रारींच्या निवारणासाठी पाचोरा उपविभागीय कार्यालयात आयोजित 'जनसमाधान बैठकी'त ते बोलत होते. यावेळी नागरिकांनी विविध विषयांवरील अर्ज सादर करून समस्या मांडल्या. जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्येक अर्जाची माहिती जाणून घेत संबंधित विभागांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. तसेच अर्जदारांच्या समस्या लवकरात लवकर सोडविण्यात येतील, असा विश्वास त्यांनी अर्जदारांना दिला. बैठकीस उपविभागीय अधिकारी भूषण अहिरे, पाचोरा तहसीलदार विजय बनसोडे, भडगाव तहसीलदार शितल सोलाट यांच्यासह कृषी, आरोग्य, पोलीस, सार्वजनिक बांधकाम, वीज वितरण, महिला व बाल विकास, जिल्हा परिषद आणि पुरवठा विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



## जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला पाचोरा तालुकास्तरीय सर्व विभागांचा आढावा

जळगाव । प्रतिनिधी

पाचोरा तालुक्यातील सर्व तालुकास्तरीय विभागांच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला तसेच विभागनिहाय अडचणी जाणून घेऊन त्या तातडीने सोडविण्याच्या सूचना संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या. बैठकीत प्रशासकीय कामकाज, उपलब्ध मनुष्यबळ, इमारतींची स्थिती, वाहन व्यवस्थापन, कार्यालयीन सुविधा, कृषी नियोजन, पूरनियोजन, पाणीपुरवठा तसेच शैक्षणिक तयारी या विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

## डिजिटल आरोग्य क्रांतीच्या दिशेने राज्याचे मोठे पाऊल



रायगड–अलिबाग । प्रतिनिधी

आरोग्य व्यवस्थेचे डिजिटलायझेशन केल्याने नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक व परिणामकारक आरोग्य सेवा उपलब्ध करून देता येणार आहेत. रायगड जिल्ह्यात आयुष्मान भारत डिजिटल मिशनच्या माध्यमातून सर्व सुविधा तळागाळापर्यंत पोहचावायच्या आहेत तेव्हाच रायगड हे 'मॉडेल जिल्हा' बनेल. यासाठी आपण रोडमॅप बनवून त्यानुसार काम करण्याची आपल्या सर्वांची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाचे सीइओ डॉ. सुनीलकुमार बर्नवाल यांनी केले.

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्यात आयुष्मान भारत डिजिटल मिशनची (–इऊव्) प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे. या अंतर्गत रायगड जिल्ह्याची 'मॉडेल जिल्हा' म्हणून निवड करण्यात आली असून, या महत्त्वाकांक्षी उपक्रमाच्या यशस्वी सुरुवातीसाठी आज पनवेल येथील आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके सभागृहात 'रायगड मॉडेल जिल्हा उद्घाटन कार्यशाळेचे' उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे–बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही महत्वपूर्णया कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

## 'मेडिसिटी'द्वारे जागतिक दर्जाची आरोग्यसेवा परिसंस्था प्रत्यक्षात येणार–मुख्यमंत्री फडणवीस

क्लीव्हलँड, ओहायो । प्रतिनिधी

**'मेडिसिटी' ही रुग्णसेवा, वैद्यकीय शिक्षण, संशोधन, नवोन्मेष आणि प्रतिभेला एका एकात्मिक केंद्रात एकत्र आणणारी जागतिक दर्जाची आरोग्य सेवा परिसंस्था उभारण्याची राज्य शासनाची संकल्पना आहे. ही संकल्पना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मांडलेल्या 'हील इन इंडिया' या दृष्टिकोनाशी सुसंगत असून लवकरच ती प्रत्यक्षात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.**




जगातील सर्वात महत्त्वाकांक्षी आरोग्य सेवा परिसंस्थांपैकी एक उभारण्याच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल टाकत महाराष्ट्र शासन, क्लीव्हलँड क्लिनिक (सीसी), ब्रुकफिल्ड ॲसेट मॅनेजमेंट आणि आरोधन हेल्थ सिटी (एएचसी) यांनी नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटीच्या विकासासाठी सहकार्य करण्याबाबत सामंजस्य करार केला. या ऐतिहासिक प्रसंगाचे साक्षीदार म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मुंबईहून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते. त्यांच्यासोबत वरिष्ठ शासकीय अधिकारी तसेच ब्रुकफिल्ड आणि एएचसीचे प्रतिनिधीही उपस्थित होते. मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे यांनी क्लीव्हलँड क्लिनिकच्या मुख्यालयात महाराष्ट्र शासनाचे प्रतिनिधित्व केले. क्लीव्हलँड क्लिनिकच्या पथकाचे नेतृत्व त्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. टोमिस्लाव मिहाल्जेविक, डॉ. समीर कपाडिया (अध्यक्ष, कार्डिओव्हॅस्क्युलर मेडिसिन), डॉ. फाल्कोने (अध्यक्ष, इमर्जिंग मार्केट्स) आणि आर्सेलर मित्तलचे कार्यकारी अध्यक्ष तसेच क्लीव्हलँड क्लिनिकचे संचालक मंडळ सदस्य श्री. लक्ष्मी मित्तल यांनी केले. आरोधन हेल्थ सिटीच्या डॉ. सलोनी पटवर्धन याही क्लीव्हलँड येथे उपस्थित होत्या.

## प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाला १० वर्षे पूण

लातूर । प्रतिनिधी

**भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाद्वारे राबविण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाला ९ जून २०२६ रोजी १० वर्षे पूर्ण झाली.**

९ जून २०१६ रोजी सुरू झालेल्या या अभियानांतर्गत दर महिन्याच्या ९, १८ आणि २७ तारखेला गर्भवती महिलांना मोफत, सर्वसमावेशक आणि गुणवत्तापूर्ण प्रसूतीपूर्व आरोग्य सेवा पुरविल्या जातात. गेल्या दहा वर्षांत उच्च जोखीम गर्भधारणा असलेल्या महिलांची लवकर ओळख, योग्य व्यवस्थापन आणि संदर्भ सेवा बळकट करण्यात या अभियानाने मोलाची भूमिका बजावली आहे. या महत्वपूर्ण टप्प्याचे औचित्य साधून देशभर 'पीएमएसएमए'ची १० वर्ष: सुरक्षित गर्भधारणा, निरोगी माता, सक्षम भारत या संकल्पनेअंतर्गत विशेष आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.या उपक्रमावेळी प्रभारी सहायक संचालक (वैद्यकीय) डॉ. प्रीती बादाडे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी बरुरे, जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. नितीन बोडके, वैद्यकीय अधिकारी डॉ. भताने, डॉ. तोंडारे, सी.पी.एम. पवन वाडेकर, संदीप यादव यांच्यासह आरोग्य केंद्रातील कर्मचारी उपस्थित होते.

## कृषी मित्र' भरतीच्या नावाखालील बोगस जाहिरातींपासून सावध राहा – कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

मुंबई । प्रतिनिधी

राज्यात 'कृषी मित्र' भरतीच्या नावाखाली सोशल मीडिया आणि इतर माध्यमांद्वारे काही व्यक्तींकडून बोगस जाहिराती प्रसारित करून शेतकरी, युवक व नागरिकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न होत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा कोणत्याही खोट्या जाहिरातींवर विश्वास ठेवू नये, तसेच कोणीही याला बळी पडून नये, असे आवाहन कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले आहे. कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या कोणत्याही भरती प्रक्रियेची माहिती केवळ शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर, अधिकृत प्रसिद्धी माध्यमांद्वारे किंवा संबंधित कार्यालयांमार्फतच जाहीर केली जाते. त्यामुळे सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या अप्रमाणित जाहिराती, अर्जासाठी शुल्क भरण्याच्या सूचना, वैयक्तिक बँक खात्यावर पैसे जमा करण्याचे आवाहन किंवा संशयास्पद लिंक यांना बळी पडू नये असे आवाहन केले आहे.

# राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२६ साठी नामांकन अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै

नवी दिल्ली । प्रतिनिधी

प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार (PMRBP) २०२६ साठी ऑनलाइन नामांकन प्रक्रिया सुरू केली असून अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख ३१ जुलै २०२६ निश्चित करण्यात आली आहे. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज https://awards.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने सादर करावेत असे आवाहन महिला आणि बाल विकास मंत्रालयाने केले आहे.

### महाराष्ट्र गट–ब सेवा संयुक्त पुर्व परिक्षा–२०२६

जळगाव : महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत रविवार, दि. १४ जून २०२६ रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या महाराष्ट्र गट ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा–२०२६ च्या पार्श्वभूमीवर जळगाव शहरात कॉपीमुक्त अभियान राबविण्यात येणार असून परीक्षेदरम्यान गैरप्रकारांना रोखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी वैशाली चव्हाण यांनी भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. जळगाव शहरात या परीक्षेसाठी ३२ परीक्षा उपकेंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. परीक्षा केंद्रांवर गैरप्रकार होण्याची तसेच शांतता व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन हे आदेश लागू करण्यात आले आहेत.

### विशेष सखोल मतदार यादी पुनरिक्षण मोहिमेत पात्र मतदारांनी सक्रिय सहभाग नोंदवावा–जिल्हाधिकारी डॉ.घोष

सांगली : भारत निवडणूक आयोगाने भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ३२४ नुसार व लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५० च्या कलम २१ अन्वये महाराष्ट्र राज्यात मतदार यादीचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम जाहीर केला आहे. या कार्यक्रमांतर्गत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (इडज) हे ३० जून २०२६ ते २९ जुलै २०२६ या कालावधीत घरोघरी भेट देऊन मतदार यादी तयार करण्यासाठी गणनेचा नमुना फॉर्म भरणार आहेत. सांगली जिल्ह्यातील आठही विधानसभा मतदारसंघांतील पात्र मतदारांनी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदवून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे केले आहे.

### लातूर जिल्ह्यातील बोंबळीच्या गायकवाड कुटुंबीयांना दिलासा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून आर्थिक सहाय्यासह, शेतकऱ्याला मिळाला बैल

मुंबई : वीज पडून बैल दगावल्याने जोखडाला पत्नीला जुंपण्याची वेळ आलेल्या लातूर जिल्ह्यातील भूमिहीन शेतकरी काशिनाथ गायकवाड यांच्या व्यथेची दखल थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली, अन् या शेतकरी कुटुंबाला अवघ्या काही तासात बैल आणि दगावलेल्या बैलाच्या नुकसान भरपाई पोटीची रक्कम मिळाली. यात मुख्यमंत्री फडणवीस यांचे निर्देश आणि जिल्हा प्रशासनासोबतच, अन्य विभागांनी दाखवलेली संवेदनशीलता चर्चेची ठरली आहे. या संवेदनशीलतेमुळे आता काशिनाथ गायकवाड यांना पत्नीला बैलाच्या जागी जुंपावे लागणार नसल्याने, या कष्टकरी कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे.

### मेंढपाळांची भटकंती थांबविण्याच्या दृष्टीने प्रकल्प राबविण्यासाठी अहवाल सादर करावा– पशुसंवर्धन मंत्री मुंडे

मुंबई : भटकंती करणाऱ्या मेंढपाळांची माहिती संकलीत करुन त्यांची भटकंती थांबविण्याच्या दृष्टीने प्रायोगिक तत्वावर अर्धबंदिस्त पद्धतीने मेंढीपालन प्रकल्प योजना राबविण्यासाठी अभ्यास अहवाल सादर करण्याचे निर्देश पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आज येथे दिले. राज्यातील मेंढपाळांच्या भटकंती व स्थलांतराच्या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आढावा बैठक पार पडली. कृषी मंत्री दत्ता भरणे, आमदार प्रताप अडसड, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन, पुण्यश्लोक अहिल्याबाई महाराष्ट्र मेंढी विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. शीतलकुमार मुकणे, अमरावती मेंढपाळ धनगर विकास मंचचे अध्यक्ष संतोष महात्मे आदी यावेळी उपस्थित होते.

### रस्त्यांचे मोजमाप व सीमांकन तातडीने पूर्ण करावे–मंत्री आदिती तटकरे

मुंबई : रायगड जिल्ह्यातील मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत प्रलंबित रस्ते आणि पाणंद रस्त्यांची कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी आवश्यक प्रक्रिया गतिमान करावी. गाव नकाशावर असलेल्या रस्त्यांच्या कामांची सद्य:स्थिती दर्शविणारा सविस्तर अहवाल सादर करावा; तसेच गाव नकाशावर नोंद नसलेल्या प्रलंबित रस्त्यांचे मोजमाप आणि आवश्यक सर्वेक्षणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करून रस्ते विकासाच्या कामांना गती द्यावी, असे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. मंत्रालयात आयोजित आढावा बैठकीत रायगड जिल्ह्यातील मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गतचे रस्ते, पाणंद आणि प्रलंबित रस्ते विकास कामांचा; तसेच राष्ट्रीय महामार्ग कोशिंबळे मार्गाशी संबंधित कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

### अवकाळी पंचनामे त्वरित करा, शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या–कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

मुंबई : राज्यातील मे व जून २०२६ या कालावधीत झालेल्या अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि गारपिटीमुळे बाधित झालेल्या फळपिकांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने आणि काटेकोरपणे पूर्ण करावेत. शेतकऱ्यांना कोणताही त्रास होणार नाही याची काळजी घेऊन नुकसानभरपाईची प्रक्रिया गतीमान करावी, असे निर्देश कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले. वादळी वाऱ्यामुळे झालेल्या फळपीक नुकसानीसंदर्भात मंत्रालयात आयोजित बैठकीत मंत्री भरणे बोलत होते. पाणीपुरवठा मंत्री तथा जळगावचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले (व्ही.सी.व्दारे), आमदार चंद्रकात पाटील, आमदार अमोल जावळे, कृषि विभागाचे सचिव परिमल सिंह (व्ही.सी.व्दारे), कृषी आयुक्त सुरज मांढरे, कृषी संचालक (विस्तार) रफीक नाईकवडी, कृषी संचालक विनयकुमार आवटे, जळगाव जिल्हाधिकारी रोहन घुगे, भारतीय कृषी विमा कंपनीचे मुख्य प्रबंधक अजित कुमार, उपव्यवस्थापक अतुल झनकर आदी बैठकीस उपस्थित होते.

### अकोला पीक विमा प्रकरणाचा तपासणी अहवाल सादर करा – कृषीमंत्री दत्तात्रय भरणे

मुंबई : अकोला जिल्ह्यातील खरीप व रब्बी हंगाम २०२३–२४ आणि खरीप हंगाम २०२४–२५ मधील पीक विमा भरपाई संदर्भातील तक्रारींचा जिल्हाधिकारी यांचा अहवाल शासनाला सादर करावा, असे निर्देश देत या प्रकरणासंदर्भात विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांच्या बैठकींचे इतिवृत्त मागवून चौकशी करण्याचे आदेश कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी प्रशासनाला दिले.

खरीप व रब्बी हंगाम २०२३ – २४ व खरीप हंगाम २०२४– २५मधील एचडीएफसी इरगो इन्श्युरन्स कंपनीकडून नुकसान भरपाई मिळणेबाबत मंत्रालयात आयोजित बैठकीत कृषीमंत्री भरणे बोलत होते. बैठकीला कामगार मंत्री आकाश फुंडकर, कृषी राज्यमंत्री ड आशिष जयस्वाल, आमदार हरीष पिंपळे, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, (व्ही.सी.व्दारे) कृषी आयुक्त सुरज मांढरे, कृषि संचालक विनयकुमार आवटे, अकोला जिल्हाधिकारी वर्षा मीना, पीक विमा कंपनीचे प्रतिनिधी बाळासाहेब गोपाळ, भारतीय किसान संघाचे प्रांत उपाध्यक्ष राहुल राठी आदी उपस्थित होते.

cmyk

SHIV VANI
शिव वाणी

क्रीडा,न्यायनिवाडा,
क्राईम घडामोडी...

सोमवार, दि.१५ जून २०२६
Monday, Dt. 15 June 2026

# महाराष्ट्रासह देश हादरविणाऱ्या गुन्हेगारी घटनांची मालिका..!

## क्रीडा विश्वातील ताज्या घडामोडी...

### क्रीडा विश्वात क्रिकेट, टेनिस, हॉकी आणि बुद्धिबळात भारतीयांचा जलवा

नवी दिल्ली । विशेष प्रतिनिधी

या आठवड्यात जागतिक आणि भारतीय क्रीडा क्षेत्रात अनेक महत्त्वपूर्ण घडामोडी घडल्या. क्रिकेटमधील रोमांचक सामने, टेनिसमधील मोठ्या स्पर्धा, हॉकीतील भारतीय संघाची कामगिरी आणि बुद्धिबळातील भारतीय ग्रँडमास्टर्सची चमक यामुळे क्रीडाप्रेमींचे लक्ष वेधले गेले.




### क्रिकेट विश्वात भारताची दमदार कामगिरी

नवी दिल्ली – भारतीय क्रिकेट संघाने आंतरराष्ट्रीय मालिकेत सातत्यपूर्ण कामगिरी करत प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व कायम ठेवले. युवा खेळाडूंनी संधीचे सोने करत संघ व्यवस्थापनाचा विश्वास संपादन केला. फलंदाजीसह गोलंदाजी विभागानेही उल्लेखनीय कामगिरी केली.




### टेनिसमध्ये ग्रँडस्लॅम स्पर्धांकडे लक्ष

मुंबई – जागतिक टेनिस विश्वात प्रमुख खेळाडूंनी आगामी ग्रँडस्लॅम स्पर्धांसाठी जोरदार तयारी सुरू ठेवली. पुरुष आणि महिला गटातील अव्वल मानांकित खेळाडूंनी महत्त्वाच्या स्पर्धांमध्ये विजय मिळवत आपली दावेदारी मजबूत केली.




### भारतीय हॉकी संघाची सरस कामगिरी

मुंबई – भारतीय पुरुष हॉकी संघाने आंतरराष्ट्रीय स्पर्धेत प्रभावी खेळाचे प्रदर्शन केले. बचाव आणि आक्रमणातील संतुलित खेळामुळे भारताने महत्त्वाचे गुण मिळवत जागतिक क्रमवारीतील स्थान अधिक मजबूत केले.



### बुद्धिबळात भारतीय ग्रँडमास्टर्सची चमक

मुंबई – भारतीय बुद्धिबळपटूंनी आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत देशाचे नाव उंचावले. युवा खेळाडूंच्या सातत्यपूर्ण यशामुळे भारत बुद्धिबळ महासत्ता म्हणून अधिक बळकट होत असल्याचे चित्र दिसून आले.



### थलेटिक्समध्ये ऑलिम्पिक तयारीला वेग

मुंबई – भारतीय थलेटिक्सपटूंनी विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली. आगामी जागतिक स्पर्धा आणि ऑलिम्पिक पात्रता स्पर्धांच्या पार्श्वभूमीवर खेळाडूंनी तयारी तीव्र केली आहे.

---

**मुंबई । विशेष प्रतिनिधी**

**या आठवड्यात महाराष्ट्रासह देशभरात घडलेल्या काही गंभीर गुन्हेगारी घटनांनी कायदा– सुव्यवस्थेबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. खून, लाचखोरी, अमली पदार्थांविरोधातील कारवाया आणि संघटित गुन्हेगारीविरोधातील मोहिमा यामुळे क्राईम विश्व चांगलेच चर्चेत राहिले.**

### कॅबमध्ये रक्तरंजित शेवट,महिलेच्या हत्येनंतर चालकाची आत्महत्या

ठाणे – जिल्ह्यातील बदलापूर परिसरात एका कॅब चालकाने महिलेची धारदार शस्त्राने हत्या करून नंतर आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. घटनेमागील नेमके कारण शोधण्यासाठी पोलिसांचा तपास सुरू आहे.

### मुंबईत पैशांच्या वादातून नातेवाईकावर जीवघेणा हल्ला

मुंबई – एमआरए मार्ग परिसरात पैशांच्या वादातून एका व्यक्तीने आपल्या नातेवाईकावर चाकूने हल्ला केल्याची घटना घडली. आरोपीला पोलिसांनी अटक केली असून पुढील तपास सुरू आहे.

## क्राईम विश्वातील धक्कादायक घडामोडी रक्तरंजित आठवडा....



### नागपुरात एसीबीची मोठी कारवाई, लाचखोर अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई

नागपूर – लाचखोरी प्रकरणात अडकलेल्या सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यावर राज्य शासनाने निलंबनाची कारवाई केली. यापूर्वी एसीबीने सापळा रचून लाच स्वीकारणाऱ्या कर्मचाऱ्याला पकडले होते.



### आजोबांवर हल्ल्याचा डाव, निष्पाप नातवाचा बळी, सांगली हादरली.!

सांगली – येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालकांच्या घरात घुसलेल्या पाच जणांच्या टोळीने १४ वर्षीय वेदांत बंडगर याच्यावर जवळून गोळीबार करून हत्या केली. मूळ लक्ष्य आजोबा असल्याचा प्राथमिक तपासात संशय व्यक्त करण्यात आला असून या घटनेने राज्यभर खळबळ उडाली आहे. एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे.



### गोवा खूनप्रकरणातील आरोपी नागपूर रेल्वे स्थानकावर जेरबंद

**गोवा – खूनप्रकरणातील दोन फरार आरोपींना नागपूर रेल्वे स्थानकावर आरपीएफ आणि गोवा पोलिसांनी संयुक्त कारवाईत अटक केली. सीसीटीव्हीच्या मदतीने आरोपींचा माग काढण्यात आला. या आठवड्यातील घटनांमध्ये वैयक्तिक वैरातून झालेले खून, आर्थिक व्यवहारांतील वाद, लाचखोरी आणि संघटित गुन्हेगारीचे प्रकार ठळकपणे समोर आले. विशेषतः अल्पवयीन मुलाच्या हत्येने आणि महिलेवरील हिंसक घटनेने समाजमन हेलावले आहे. दुसरीकडे, एसीबी आणि पोलिसांनी केलेल्या कारवायांमुळे कायद्याचा धाक कायम असल्याचेही दिसून आले. मात्र वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी प्रभावी तपास, जलद न्यायप्रक्रिया आणि सामाजिक जागरूकता यांची अधिक आवश्यकता असल्याचे या घटनांनी अधोरेखित केले आहे.**

## धर्मापुरीत 'एलसीबी'ची मोठी कारवाई; १० लाखांचा गांजा जप्त, दोन आरोपी अटकेत

**बीड । प्रतिनिधी**

**परळी ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील धर्मापुरी येथे स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) केलेल्या धडक कारवाईत गांजा विक्रीच्या मोठ्या अड्ड्याचा पर्दाफाश करण्यात आला आहे. या कारवाईत २० किलो ३४० ग्रॅम गांजा, इलेक्ट्रॉनिक वजनकाटा आणि इतर साहित्य असा एकूण ९ लाख ७७ हजार ३२० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून दोघांना अटक करण्यात आली आहे.**




स्थानिक गुन्हे शाखेला (एलसीबी)गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली होती की धर्मापुरी येथील बाबूलाल उर्फ बबलू आतार हा आपल्या राहत्या घरातून गांजाची बेकायदेशीर विक्री करत आहे. ही माहिती अत्यंत खात्रीशीर असल्याने पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांनी तात्काळ वरिष्ठ अधिकाऱ्यांना याबाबत अवगत करून कारवाईची परवानगी घेतली. त्यानंतर गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक धनराज जारवाल यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार करण्यात आले. या पथकासोबत महसूल विभागातील अधिकारी, मंडळ अधिकारी आणि तलाठी यांनाही समाविष्ट करण्यात आले, जेणेकरून कारवाई कायदेशीर प्रक्रियेत पारदर्शकपणे पार पडेल. पथकाने धर्मापुरीतील संबंधित घरावर अचानक छापा टाकला. घराची कसून झडती घेतली असता मोठ्या प्रमाणात गांजा साठा आढळून आला. तसेच गांजाचे वजन मोजण्यासाठी वापरण्यात येणारा इलेक्ट्रॉनिक काटा देखील जप्त करण्यात आला. जप्त केलेला गांजा विक्रीसाठी तयार अवस्थेत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून, हा साठा स्थानिक पातळीवर वितरित केला जात असल्याची प्राथमिक माहिती पोलिसांना मिळाली आहे. या प्रकरणी सपोनि धनराज जारवाल यांच्या फिर्यादीवरून परळी ग्रामीण पोलीस ठाणे येथे गु.र.नं. २७४/२०२६ नुसार एनडीपीएस (एनडीपीएस) कायदा कलम २० आणि २९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कलम २० : गांजाचे उत्पादन, विक्री किंवा वाहतूक कलम २९ : गुन्ह्यात सहभाग/षड्यंत्र या दोन्ही कलमानुसार आरोपींवर गंभीर स्वरूपाची कारवाई होऊ शकते. या प्रकरणात शेख बाबूलाल आतार आणि वसीम बाबूलाल आतार (दोघे रा. धर्मापुरी, ता. परळी, जि. बीड) यांना अटक करण्यात आली आहे. त्यांची चौकशी सुरू असून या नेटवर्कमध्ये आणखी कोण सहभागी आहेत का, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. ही कारवाई प्रभारी पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे (अंबाजोगाई उपविभाग) आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत सहाय्यक पोलीस निरीक्षक धनराज जारवाल, पोलीस अंमलदार दिलीप गिते, भागवत शेलार, दीपक खांडेकर, महिला पोलीस अंमलदार स्वाती मुंडे, चालक हराळे तसेच परळी ग्रामीण पोलीस ठाण्याचे कर्मचारी यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. जप्त केलेला गांजा कुठून आणला गेला, त्याचे वितरण कोणत्या भागात होत होते आणि यामागे मोठे रॅकेट आहे का, याचा सखोल तपास पोलीस करत आहेत. ही कारवाई परिसरात मोठी चर्चा निर्माण करणारी ठरली आहे.

## चकलांबा व माजलगाव ग्रामीण पोलिस ठाण्यातील घरफोडीचे गुन्हे उघडकीस



### बीड स्थानिक गुन्हे शाखेची यशस्वी कामगिरी

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील विविध ठिकाणी घडलेल्या घरफोडी व चोरीच्या गुन्ह्यांचा छडा लावण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेकडून समांतर तपास सुरू असून दोन वेगवेगळ्या प्रकरणांचा यशस्वी उलगडा करण्यात आला आहे.**

चकलांबा पोलीस ठाणे गु.र.नं. १६७/२०२६ अन्वये दाखल गुन्ह्यात गेवराई रोडवरील सूरज बिअर बार अँड परमिट रूम येथे अज्ञात चोरट्यांनी खिडकी तोडून विविध कंपनीच्या दारूच्या बाटल्या तसेच गल्ल्यातील रोख रक्कम चोरी केल्याची घटना घडली होती. या गुन्ह्याचा तपास करताना सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपींचा माग काढण्यात आला. गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी गेवराईकडे चकलांबा रोडने येत असल्याचे समजताच स्थानिक गुन्हे शाखेने महार टाकळी परिसरात सापळा रचून तीन आरोपींना ताब्यात घेतले. त्यामध्ये काशिक शिरसिंग नागपुरे (रा. मुंढवा, पुणे), आदित्य मयूर जाधव (रा. मांजरी, पुणे) आणि हर्षवर्धन मोहन रेड्डी (रा. केशवनगर, पुणे) यांचा समावेश आहे. चौकशीत त्यांनी गुन्ह्यात सहभाग असल्याची कबुली दिली असून त्यांना पुढील कारवाईसाठी चकलांबा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. त्याचप्रमाणे माजलगाव ग्रामीण पोलीस ठाणे गु.र.नं. १५३/२०२६ अंतर्गत दाखल घरफोडी प्रकरणाचाही स्थानिक गुन्हे शाखेने तपास करून उलगडा केला आहे. तांत्रिक विश्लेषण व गुप्त माहितीच्या आधारे एका विधी संघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून सुमारे ८०,५०० किंमतीचा चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या दोन्ही यशस्वी कारवाया बीडच्या पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि स्थानिक गुन्हे शाखा प्रभारी पोनि. शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडल्या. चकलांबा प्रकरणात पोउपनि श्रीराम खटावकर, श्रीखर औटे तसेच स्थानिक गुन्हे शाखेतील पथकाने आणि माजलगाव प्रकरणात पोउपनि महेश विघ्ने व त्यांच्या पथकाने विशेष कामगिरी बजावली.

### राज्यातील सर्व आस्थापनांची पॉश अधिनियमानुसार तपासणी करा–महिला व बाल विकास आयुक्त

**मुंबई । प्रतिनिधी**

**कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण करण्यासाठी पॉश कायद्यानुसार समिती स्थापन करणे अनिवार्य आहे. राज्यामध्ये या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महिला व बाल विकास विभागातील अधिकाऱ्यांबरोबरच जिल्हाधिकारी कार्यालयातील प्राधिकृत करण्यात आलेले अधिकारी यांचेसह १२ संवर्गातील ४००० पेक्षा जास्त अधिकाऱ्यांनी राज्यातील शासकीय तसेच खासगी आस्थापनांमध्ये अधिनियमाची योग्य पद्धतीने अंमलबजावणी होत आहे किंवा नाही याची तातडीने तपासणी करण्याचे निर्देश आयुक्त यांनी दिले आहेत.**

आयुक्त डॉ.जगदीश मिनीयार यांच्या अध्यक्षतेखाली दुरदृश्य प्रणालीद्वारे बैठक झाली. बैठकीला राज्यातील जिल्हाधिकारी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी, माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी, अंगणवाडी पर्यवेक्षिका, मुख्यसेविका यांचेसह सर्व १२ संवर्गातील अधिकारी उपस्थित होते.

### आदिवासी समाजातील कलाकारांना व्यासपीठ– मंत्री डॉ. अशोक वुईके

**मुंबई । प्रतिनिधी**

**आदिवासी जनजाती समाजातील अनेक गुणवंत व्यक्तींना आजवर योग्य संधी मिळाली नव्हती. शासनाच्या पुढाकारामुळे त्यांना आता स्वतःची कला, विचार आणि परंपरा व्यापक समाजापर्यंत पोहोचविण्याची संधी उपलब्ध झाली आहे, असे सामाजिक न्याय मंत्री डॉ.अशोक वुईके यांनी सांगितले.**

कार्यक्रमाच्या प्रारंभी राज्यपाल आणि इतर मान्यवरांनी क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा आणि अन्य क्रांतीकारी यांना अभिवादन केले आणि त्यानंतर वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमात शिवा दिघे आणि कलाकारांनी कलेचे सादरीकरण केले आणि नाशिक जिल्ह्यातील शिक्षक देवदत्त चौधरी आणि सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर प्रभावती नाईक यांनी मनोगत व्यक्त केले.

# न्यायालयीन निर्णयांचा धडाका..!

## सर्वोच्च न्यायालय आणि मुंबई उच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण निकाल

नवी दिल्ली–मुंबई । विधी प्रतिनिधी

देशातील न्यायव्यवस्थेत या आठवड्यात काही महत्त्वपूर्ण निर्णय देण्यात आले. सर्वोच्च न्यायालय आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालांनी सामाजिक, शैक्षणिक, निवडणूक आणि आर्थिक क्षेत्रांवर दूरगामी परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**गृहिणींना 'राष्ट्रनिर्माती'चा दर्जा; नुकसान भरपाईसाठी मासिक उत्पन्न ३० हजार मान्य..**

नवी दिल्ली – सर्वोच्च न्यायालयाने ऐतिहासिक निर्णय देताना गृहिणींच्या विनामूल्य घरगुती कामाला आर्थिक मूल्य देण्याची गरज अधोरेखित केली. मोटार अपघात नुकसानभरपाई प्रकरणांमध्ये गृहिणीचे काल्पनिक मासिक उत्पन्न ३० हजार धरावे, असे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायालयाने गृहिणींना राष्ट्रनिर्माती असे संबोधत त्यांच्या योगदानाला मोठी मान्यता दिली.


**निवडणूक सुरू झाली की कोर्टाचे हात बांधले जातात, सर्वोच्च न्यायालयाची स्पष्ट भूमिका**

**देशभर गाजले सर्वोच्च व उच्च न्यायालयांचे महत्त्वपूर्ण निकाल**

नवी दिल्ली – राज्यसभा निवडणुकीसंदर्भातील एका याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक प्रक्रिया सुरू झाल्यानंतर न्यायालयाने हस्तक्षेप करू नये, हा स्थापित कायदेशीर सिद्धांत पुन्हा अधोरेखित केला.

**विदर्भातील शाळा ३० जूनलाच सुरू करा – मुंबई उच्च न्यायालय**





मुंबई – उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने विदर्भातील उष्णतेचा विचार करून शाळा ३० जूनपूर्वी सुरू न करण्याचे आदेश दिले. शिक्षण विभागाने पूर्वीच्या न्यायालयीन आदेशांकडे दुर्लक्ष केल्याबद्दल न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली.

**एअरटेल आणि व्होडाफोन आयडियाला मोठा दिलासा**

मुंबई उच्च न्यायालयाने दूरसंचार विभागाने लादलेल्या वन–टाईम स्पेक्ट्रम शुल्कासंदर्भातील आदेश रद्द केले. या निर्णयामुळे दूरसंचार क्षेत्रातील दोन मोठ्या कंपन्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे.

**'राइट टू बी फॉरगॉटन' हा गोपनीयतेचा मूलभूत अधिकार**

दिल्ली – उच्च न्यायालयाने राइट टू बी फॉरगॉटन (विसरले जाण्याचा अधिकार) हा भारतीय संविधानाच्या कलम २१ अंतर्गत गोपनीयतेच्या अधिकाराचा भाग असल्याचे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदविले. डिजिटल युगातील नागरिकांच्या अधिकारांसाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. या आठवड्यातील न्यायालयीन निर्णयांमध्ये सामाजिक न्याय, महिलांचे योगदान, निवडणूक प्रक्रियेची पवित्रता, शिक्षण व्यवस्थेतील शिस्त आणि नागरिकांच्या डिजिटल हक्कांचे संरक्षण या विषयांना विशेष महत्त्व देण्यात आले. न्यायपालिका केवळ वाद सोडविणारी संस्था नसून समाजाच्या बदलत्या गरजांनुसार कायद्याचे नव्याने स्पष्टीकरण देणारी घटनात्मक संस्था असल्याचे या निकालांमधून पुन्हा अधोरेखित झाले आहे.

हे पत्रक, मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री वैभव विवेक स्वामी यांनी अंकिता ऑफसेट प्रिंटींग, प्लॉट नं.डी–३ एम.आय.डी.सी.बीड–४३११२२ येथे छापून साप्ताहिक शिववाणी बीड कार्यालय : क्रांती नगर, तळेकर निवास जवळ, डॉ.बारकुल हॉस्पिटलजवळ, बीड येथून प्रसिध्द केले. (सर्व वाद बीड न्यायकक्षेत)

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ANKITA OFFSET PRINTING, POLOT NO.D-3, MIDC BEED-431122 AND PUBLISHED AT. THE OFFICE OF W E E K LY SHIVVANI, BEED OFFICE : KRANTI NAGAR, NEAR TALEKAR NIWAS, NEAR DR.BARKUL HOSPITAL, BEED. (JURISDICTION AT BEED)

cmyk